# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

**टो. रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय, डॉ. ए.एल.नायर रोड, मुंबई सेंट्रल, मुंबई – 400 008.**

……………………..

**क्र. टिएनटी/2980** दि.05.03.2024

**बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो. रा. वैद्यकीय महाविद्यालयात** HMIS **प्रणालीसाठी 07 डेटा एन्ट्री ऑपरेटर या संवर्गाची पदे कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी जाहिरात.**

बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो. रा. वैद्यकीय महाविद्यालयात HMIS प्रणालीसाठी 07 डेटा एन्ट्री ऑपरेटर या संवर्गातील रिक्त पदे (27.10.2023 ते 26.10.2024) या कालावधी करीता दर 40 दिवसानी 01 दिवसाचा सेवाखंड देण्याच्या अटीसह कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव/वर्ग | रिक्त पदे |
|---|---|---|
| 1 | डेटा एन्ट्री ऑपरेटर | 7 |

**डेटा एन्ट्री ऑपरेटर हया पदाकरिता शैक्षणिक अर्हता-**

(अ) 1. उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यामिक व उच्च माध्यामिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यामिक प्रमणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा.

**आणि**

2. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा वाणिज्य /विज्ञान /कला/ विधि किंवा तत्सम शाखांचा पदवीधर असावा आणि प्रथम प्रयत्नात किमान 45% गुणांसह उत्तीर्ण असावा.

(ब) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र वा तत्सम किंवा उच्च परीक्षा 100 गुणांचे मराठी व 100 गुणांचा इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

(क) उमेदवारान शासनाची इंग्रजी व मराठी टंकलेखनाची प्रत्येकी किमान 30 शब्द प्रति मिनिट वेगाची परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र असावे.

(ड) 1. उमेदवाराजवळ एमएससीआयटी (MS-CIT) परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा शासन निर्णय क्र.मातंस 2012/प्र.क्र.277/39 दि.04.02.2013 मध्ये नमूद केलेल्या संगणक/ माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तर्णी केल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

2. उमेदवाराला संगणकातील ऑपरेटिंग सिस्टम, वर्ड प्रोसेसिंग, स्प्रेडशिट, प्रेझेनटेशन, डेटाबेस सॉफ्टवेअर, ई-मेल आणि इंटरनेट इत्यादीविषयी उत्तम ज्ञान असावे.

(इ) डेटा एन्ट्री ऑपरेटर कामकाजाचा अनुभव असल्यास त्यांना प्राध्यान्य दिले जाईल.

**वयोमर्यादा** – उमेदवारोचे वय 18 वर्षापेक्षा कमी व 33 वर्षापेक्षा जास्त असता कामा नये

**वेतनश्रेणी** – निश्चित वेतन दरमहा रु. 18000/- निश्चित (कोणताही भत्ता अनुज्ञेय नाही)

**निवडीचे निकष** – प्राप्त झालेल्या उमेदवाराच्या अर्जाची छाननी करुन निवड यादी प्रसारीत करण्यात येईल व निवड यादीतील उमेदवाराना मुलाखतीसाठी बोलवण्यात येईल.

**<u>सर्वसाधारण अटी</u> :-**

1. कंत्राट तत्वावर भरण्यात येणारे डेटा एन्ट्री ऑपरेटर पद नियमित स्वरुपातील नसून नियमित उमेदवार भरेपर्यत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राट कालावधी करिता असेल.
2. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील.
3. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या बदलण्यासापेक्ष आहे.
4. पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व व्यवस्थित असावा.
5. उमेदवारांनी अर्जासोबत शैक्षणिक अर्हता/व्यवसायिक अर्हता/संबंधित गुणपत्रिका साक्षांकितछायाप्रत जोडावी.
6. निवड झालेल्या उमेदवाराने रुपये 500/- च्या मुद्रांक शुल्कावर बंधपत्र नियुक्तीच्या अगोदर देणे आवश्यक आहे.
7. कामकाजातील त्रुटी, कर्तव्यावरील अनुपस्थिती तसेच वागणूक आणि कार्यालयाकडे सादर केलेल्या करारनामाचा भंग केल्यास अथवा पालन न केल्यास कंत्राटी उमेदवारांची सेवा त्याचक्षणी तात्काळ समाप्त करण्यात येईल.
8. कंत्राटी पध्दतीने नियुक्त कर्मचा-यांना नियमित पदांकरिता असणारे कुठलेही फायदे मिळणार नाहीत. तसेच आवश्यकता नसल्यास त्यांची नियुक्ती कोणत्याही क्षणी संपुष्टात येईल.
9. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या उमेदवाराची सेवा आवश्यकता वाटल्यास कधीही तसेच कुठलीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्यात येईल
10. कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या उमेदवारांनी नियमित नियुक्तीसाठी भविष्यात हक्क सांगता येणार नाही. नियमित नियुक्तीच्या वेळी कंत्राटी तत्वावर काम केलेल्याचा विचार केला जाणार नाही.
11. पोस्टाच्या विलंबामुळे कोणतीही माहिती प्राप्त होण्यास किंवा कळविण्यास विलंब झाला तर त्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेवर राहणार नाही.
12. नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त् करण्यात येईल.
13. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार अधिष्ठाता, टो. रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय यांना आहेत.
14. निवड झालेल्या उमेदवाराना तिन्ही पाळीत काम करणे बंधनकारक आहे.

15. विहित नमुन्यात सर्व बाबींची पूर्तता केलेले अर्ज, अलिकडेच काढलेल्या पासपोर्ट आकाराचे छायाचित्र  त्यावर चिकटवून अर्ज बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय, डॉ. ए.एल.नायर रोड, मुंबई सेंट्रल,मुंबई– 400 008 यांच्या आवक-जावक कार्यालयात दि.07.03.2024 पासून दि.15.02.2024 पर्यंत सर्व शनिवार, रविवार आणि सर्व सार्वजनिक सुट्टया वगळून सादर करावेत. विहित दिनांक/ वेळेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबतीतील कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार स्विकारला जाणार नाही.

**<u>खालील कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित केलेल्या छायांकित प्रती सदर अर्जासोबत सादर कराव्यात.</u>**

1. आधार कार्ड
2. पॅन कार्ड
3. वास्तव्याचा पुरावा (आधार कार्ड/ पासपोर्ट/ वाहनचालक परवाना/ वीज देयक [बिल] / दुरध्वनी देयक [बिल])
4. ओळख पुरावा (आधार कार्ड/ वाहनचालक परवाना/ पारपत्र [पासपोर्ट] / मतदान ओळखपत्र)
5. माध्यमिक शालांत परिक्षेची गुणपत्रिका (एसएससी)
6. उच्च माध्यामिक परिक्षेची गुणपत्रिका (एचएससी)
7. पदवी परिक्षेची गुणपत्रिका आणि उत्तीर्ण प्रमाणपत्र
8. इंग्रजी व मराठी टंकलेखनाची प्रत्येकी किमान 30 शब्द प्रति मिनिट वेगाची परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र.
9. एमएससीआयटी (MS-CIT) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र.
10. दोन पासपोर्ट आकाराची अलिकडील काढलेली छायाचित्रे
11. शैक्षणिक अर्हता व अनुभव या संबंधित असलेली इतर कागदपत्रे.
12. अनुभव प्रमाणपत्र

सही/-

**अधिष्ठाता**

**टो. रा. वैद्यकीय महाविद्यालय**

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## अर्जाचा नमुना

**पदाचे नाव – कंत्राटी** 'HMIS **प्रणालीसाठी डेटा एन्ट्री ऑपरेटर'**

| |
|---|
| उमेदवाराने त्याचे अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी.<br>2.5 सेमी x 3 सेमी |

**1) (अ)** संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) मराठीत : ---------------------------------------------------

**(ब)** वडिलांचे / पतीचे संपूर्ण नाव : --------------------------------------------------------------

**(क)** विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलाकरिता) : ---------------------------------------------------

**2) पत्ता :** ---------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------पिन कोड :---------

**3) मोबाईल क्र.** --------------------------

**4) लिंग :** पुरूष : स्त्री :

**5) (अ) जन्मदिनांक :**

**(ब)** दिनांक- ------------------- रोजी असलेले वय --------- वर्ष --------- महिने --------- दिवस

**6) शैक्षणिक अर्हता :**

अ)

| **शैक्षणिक अर्हता** | **विद्यापीठाचे नाव** | **गुणांचा तपशील** | | |
|---|---|---|---|---|
| | | **प्राप्त** | **पैकी** | **टक्केवारी** |
| माध्यमिक शालांत (एसएससी) परिक्षे | | | | |
| उच्च माध्यामिक शालांत (एचएससी) | | | | |
| कला/ वाणिज्य/ विज्ञान शाखेतील पदवी | | | | |

ब) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणांचा मराठी विषय (उच्च स्तर किंवा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण आहे का ? होय/नाही (प्रमाणपत्र जोडावे)

क) संगणकीय ज्ञान : MSCIT किंवा शासनाने विहित केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र आहे/नाही.

ड) इंग्रजी व मराठी टंकलेखनाचे ज्ञान आहे का ? होय/नाही (प्रमाणपत्र जोडावे)

इ) डेटा एन्ट्री ऑपरेटर कामाचा अनुभव आहे का ? होय/नाही (प्रमाणपत्र जोडावे

**7) स्थानिक पोलीस ठाण्याचा संपूर्ण पत्ता:** -----------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

सदर पदाच्या जाहिरातीतील नियम अटी व शर्ती मला मान्य आहेत.

दिनांक -

आपला /आपली विश्वासू

ठिकाण -

अर्जदाराची सही/-

**(अर्जदाराचे नांव)**